माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : २११/२०१९**

**अपिलार्थी, श्री.जनार्दन बन्सी बोदरे,**
**रा.पंतनगर, मलकापुर, ता.मलकापुर, जि.बुलडाणा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**लेखा विभाग, नगर परिषद मलकापुर, जि.बुलडाणा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद मलकापुर, जि.बुलडाणा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०८.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०८.२०१८ | २९.०८.२०१८ | १५.०९.२०१८ | ०२.११.२०१८ निर्गमित दि.०३.११.२०१८ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १०.०८.२०१८** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सन २०१६ एप्रिल ते ऑगष्ट २०१८ पर्यंत न.पा.कार्यालयातील लेखा विभागात कार्यरत असलेल्या वि.लेखापाल कार्याचा पदभार दिलेल्या लेखी परवानगी पत्राची सत्यप्रत, त्यांना स्विकारलेल्या त्या कार्यभाराची संमती प्रतची सत्यप्रत देण्यात येवुन त्या विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांची पदनिहाय नावासहीत माहिती, लेखापाल यांचे व्यतिरिक्त सहा.लेखापालाच्या स्वाक्षरीने देय धनादेश ची रोख रक्कम प्रदान होत असल्याच माहिती आणि त्याकरीता असलेल्या नियमांची, आदेशाची किंवा इतर सत्यप्रत, लेखापालनी टी.ए., डी.ए. घेतलेल्याची पुर्ण माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक १५.०९.२०१८ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती दिशाभुल करणारी व फसवणुक करणारी लिहुन देवुन जबाबदारी झटकण्यासाठी जे दस्त दिले त्यात काहीच अर्थ नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०२.११.२०१८ रोजी सुनावणी घेऊन "जन माहिती अधिकारी

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

यांनी अपिलार्थी यांना सात (०७) दिवसात विनामुल्य माहिती देण्यात यावी." असे नमुद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २१.०१.२०१९ रोजी** " मागितलेली माहिती दिली नाही, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे पालन केले नाही " असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०३.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री.तनवीर जमादार उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.आशिष बोबडे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता यांनी दि.१५.०९.२०१८ रोजी सादर केलेल्या प्रथम अपीलावर झालेल्या सुनावणी नंतर अपिलकर्त्यास पदभारा संदर्भात माहिती तसेच कुठलाही अतिरिक्त भत्ता (T.A, D.A) देण्यात आला नसल्यामुळे सदर माहिती निरंक असा प्रतिसाद या आधिच प्रदान करण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जाणून बूजून नाकारण्यात आली असून सादर केलेला माहिती अर्ज हा प्रशासनात होणाऱ्या मोठ्या भ्रष्टाचाराबाबत तसेच शासकीय कार्यालयात पारदर्शकता येण्याचे दृष्टीने दाखल केलेला आहे, असे लेखी युक्तीवादात नमूद केलेले आहे. त्यांचे माहिती अर्जाची दखल घेतल्या गेली नसल्याचाही त्यांनी युक्तीवाद केला असून जन माहिती अधिकारी यांनी जाणून बूजून माहिती नाकारली असल्याचा आरोप करीत जास्तित जास्त दंडात्मक कार्यवाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची आग्रही विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी कार्यालयीन अभिलेखावर कलम २ (च) नुसार उपलब्ध असलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेतल्यानंतर अपिलकर्ता यांना या आधिच प्रदान करण्यात आली असल्याची वास्तविकत: लक्षात घेता, वरील द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०३.०८.२०२३**

जावक क्रमांक 288 दिनांक 11 JAN 2023